आध्यात्मिक उपाय : दृष्ट – खंड २

# कापूर, काळे उडीद, विड्याचे पान आदींनी दृष्ट कशी काढावी ?

## (रुग्ण आणि बाळ यांची दृष्ट काढण्यासह)

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते**

श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ आणि अन्य



**सनातन संस्था**

**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. २०.३.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २२७ अन् अन्य ९१८ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्‌शक्ति सौ. अंजली मुकुल गाडगीळ (M.Sc.) यांचा परिचय



सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी आहेत. त्यांना सहस्रो पाने सूक्ष्मातील ज्ञान मिळाले आहे. हिंदु राष्ट्रासाठी नाडीभविष्यात महर्षींनी सांगितल्याप्रमाणे देवदर्शन आणि संतांचे संघटन यांसाठी त्या अखंड भारतभ्रमण करतात.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. दृष्ट काढण्याची पद्धत (केवळ कृती) ८**

**२. दृष्ट काढण्यासाठी वापरले जाणारे घटक आणि त्यांद्वारे दृष्ट काढण्याचे विविध प्रकार ११**

२ अ. कापूर १२

२ आ. काळे उडीद गोडेतेलात घालून त्यात तोंडवळा (चेहरा) पहाणे आणि हे तेल मारुतीच्या देवळात अर्पण करणे १४

२ इ. विड्याच्या पानाने दृष्ट काढणे १७

२ ई. तांदूळ आणि पाणी यांनी दृष्ट काढणे २०

२ उ. वहाणेने दृष्ट काढणे २१

२ ऐ. मातीचे मडके आणि पाण्याचा तांब्या यांनी दृष्ट काढणे २६

२ ओ. व्यक्तीला होणाऱ्या वाईट शक्तींच्या त्रासात घट व्हावी, यासाठी मोरपिसाचा वापर करणे २९

**३. रुग्ण (आजारी) व्यक्तीची दृष्ट काढणे, तिच्यासाठी उतारा देणे किंवा करावयाचे काही आध्यात्मिक उपाय ४०**

**४. छायाचित्रावरून दृष्ट काढणे, कागदावर नाव लिहून दृष्ट काढणे आणि नाव उच्चारून दृष्ट काढणे यांमागील शास्त्र ४१**

४ अ. छायाचित्रावरून दृष्ट काढणे ४१

४ आ. व्यक्तीचे छायाचित्र नसेल, तर तिचे नाव एका कागदावर लिहून त्या कागदाची दृष्ट काढणे ४४

४ इ. व्यक्तीचे छायाचित्र किंवा तिचे नाव लिहिलेला कागद नसेल, तर तिचे नाव उच्चारून दृष्ट काढणे ४५

**५. बाळाची दृष्ट काढणे ४६**

५ अ. बाळाला दृष्ट लागण्याची कारणे ४६

५ आ. बाळाची दृष्ट काढण्याच्या पारंपारिक पद्धती ४८

५ इ. बाळाला दृष्ट लागू नये यासाठी करावयाचे अन्य उपाय ५८

**६. दृष्ट लागलेल्या साधिकेला तिची विविध साधकांनी काढलेली दृष्ट आणि प.पू. डॉ. आठवले यांच्या सांगण्यानुसार काढलेली दृष्ट यांमध्ये जाणवलेले परिणाम ६२**

**७. दृष्ट काढणाऱ्या व्यक्तीचा अध्यात्मातील अधिकार आणि दृष्ट काढतांना वाईट शक्तीमुळे तिला होऊ शकणाऱ्या त्रासाचे स्वरूप ६५**

**८. दृष्ट काढल्यावर करणी करणाऱ्यावर होणारा परिणाम ६७**

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ६८**

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति' या उपाध्यांनी संबोधले जात आहे.

## मनोगत

सध्याच्या स्पर्धात्मक आणि भोगवादी युगात ईर्षा, द्वेषभाव, लोकेषणा, भिन्नलिंगी व्यक्तींकडे पहाण्याची वाईट दृष्टी यांसारख्या विकृतींनी बहुतांश व्यक्ती ग्रासलेल्या आहेत. या विकृतीजन्य रज-तमात्मक स्पंदनांचा त्रासदायक परिणाम सूक्ष्मातून नकळत दुसऱ्या व्यक्तींवर होतो. यालाच त्या व्यक्तींना 'दृष्ट लागणे' असे म्हणतात. तसेच कुटुंबात भांडणे, व्याधी, आर्थिक चणचण, वाईट स्वप्ने पडणे, नैराश्य, सिगारेट किंवा मद्य यांचे व्यसन यांसारख्या समस्या आता नित्याच्या झाल्या आहेत. जीवनातील ८० टक्के समस्यांमागील कारणे सकृद्दर्शनी स्थुलातील दिसत असली, तरी खरे मूळ कारण हे सूक्ष्मातील, म्हणजेच वाईट शक्तींचा त्रास, हे असते. वाईट शक्तींचा त्रास हाही दृष्ट लागण्याचाच प्रकार होय.

दृष्ट लागण्याच्या त्रासापासून रक्षण होण्यासाठी या ग्रंथात दृष्ट काढण्याचे विविध प्रकार दिले आहेत. 'या अनुषंगाने सर्वांनाच हा ग्रंथ अधिकाधिक उपयुक्त होवो', ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

### परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे.

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.